# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

Maharashtra Industrial Development Corporation

**(A Government of Maharashtra Undertaking)**

मुख्य कार्यालय : "उद्योग सारथी", महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०९३. प्रिन्सिपल कार्यालय : ४,४ (ऐ) १२ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर-१, कफ परेड, मुंबई ४०० ००५.

Head Office : "Udyog Sarathi", Mahakali Caves Road, Andheri (East), Mumbai 400 093. Principle Office : 4,4 (A), 12th Floor, World Trade Centre-1, Cuffe Parade, Mumbai-400 005.

☎:०२२-४७४८४३१२/४७४८४६७९/९९ ☎: +९१-२२-४०१६१४५१/५४

www.midcindia.org


क्रमांक: मऔविम/भूविभाग/मव्य(भूमी)/पी९८४३१ दिनांक: ०१.१२.२०२३

## परिपत्रक

विषय: महामंडळाच्या क, ड आणि ड+ विभागातील औदयोगिक क्षेत्रामध्ये उदयोगांना भूखंड वाटपात प्राधान्य देणेबाबत

संदर्भ: (१) परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/ई३६७८८, दिनांक ३१.१२.२०१८.
(२) परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/ए-८८९६७, दिनांक १६.०३.२०२१.

महामंडळाच्या विदर्भ, मराठवाडा, कोकण (केवळ रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्हे), उत्तर महाराष्ट्र (नाशिक महानगर क्षेत्रविकास प्राधिकरणचे क्षेत्र (NMRDA) वगळून) विभागातील "ड" आणि "ड + "औद्योगिक क्षेत्रातील ज्या उद्योजकांच्या प्रकल्पामधील एकूण गुंतवणूक किमान रुपये २० कोटी आहे व ज्या शेतकरी उत्पादक कंपनीची गुंतवणूक किमान रुपये १० कोटी आहे, अशा उद्योजकांना महामंडळाच्या दिनांक ३१.१२.२०१८ च्या परिपत्रकानुसार प्राधान्याने भूखंड वाटप करण्याचे धोरण निर्गमित केलेले आहे.

वरील परिपत्रकानुसार भूखंडाच्या क्षेत्राबाबत तरतुद नसल्याने उद्योजक रुपये २० कोटी गुंतवणूक दाखवून छोटया आकारचे भूखंड प्राधान्य सदराखाली वाटप करून घेतात. परंतू, छोटया आकारच्या भूखंडावर "ड" आणि "ड+" औद्योगिक क्षेत्रामध्ये रुपये २० कोटी गुंतवणूक होत नसल्याचे निर्देशनास येत असल्याने उपरोक्त परिपत्रकात खालीलप्रमाणे सुधारणा करुन परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/ए-८८९६७, दिनांक १६.०३.२०२१ अन्वये निर्गमित करणेत आलेले असून मुद्दा क्रमांक १ मध्ये खालील प्रमाणे नमूद आहे.

१. रुपये २० कोटी गुंतवणूक करणा-या उद्योजकांची कमीतकमी ५००० चौ.मी. क्षेत्राची मागणी असेल अशा अर्जदारांना प्राधान्याने भूखंड वाटप करण्याकरीता विचार व्हावा. तसेच एखाद्या विशेष प्रकल्पाची मागणी ५००० चौ.मी. पेक्षा कमी तथापि किमान ४००० चौ.मी. असेल तर त्या प्रकल्पामधील गुंतवणूक, रोजगार निर्मिती इत्यादि बाबींचा विचार करुन मुकाअ यांच्या पूर्वपरवानगीने अशी प्रकरणे भूखंड वाटप समितीसमोर ठेवण्यात यावीत.



midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

तसेच महाराष्ट्र राज्याचे नवीन माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहायभूत सेवा धोरण २०२३ चे दिनांक २७.०६.२०२३ मध्ये मुद्दा क्रमांक ४.१ मध्ये खालील प्रमाणे नमूद आहे.

४.१ माहिती तंत्रज्ञान उदयानाकरीता अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक व जागेचा वापर -

४.१.१ बहन्मुंबई क्षेत्र व महाराष्ट्रातील उर्वरित क्षेत्रासाठी अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार अनुज्ञेय राहील.

| अ. क्र. | किमान रस्ता रुंदी | बृहन्मुंबई क्षेत्राकरीता कमाल अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशाक | उर्वरित महाराष्ट्राकरीता कमाल अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक |
|---|---|---|---|
| १ | १२ मी | ३ पर्यत | ३ पर्यत |
| २ | १८ मी | ४ पर्यत | ३.५ पर्यत |
| ३ | २७ मी | ५ पर्यत | ४ पर्यत |

अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकाची कमाल मर्यादा ही वर नमूद केल्यानुसार अथवा स्थानिक विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार, यापैकी जी अधिक असेल त्यानुसार अनुज्ञेय राहील. नगर विकास विभागाने घोषित केलेले कृषी क्षेत्र, ना विकास क्षेत्र, किंवा इतर कोणतेही विशेष क्षेत्र यांचा अपवाद राहील. या क्षेत्रात अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकाची कमाल मर्यादा प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीनुसार लागू राहील.

त्यानुसार संबधित विशेष नियोजन प्राधिकरण हे प्रचलित विकास नियंत्रण नियमावली (DCRs) सर्व समावेशक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (DCRs) व एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPRs) मध्ये आवश्यक सुधारणा करतील.

महामंडळाचे दिनांक १६.०३.२०२१ च्या प्रचलित धोरणानुसार महामंडळाच्या क, ड आणि ड+ औद्योगिक क्षेत्रामध्ये भूखंडाचे वाटप करताना कमीतकमी २० कोटी गुंतवणूक करणा-या उद्योजकांची कमीतकमी ५००० चौ. मी. क्षेत्राचे तसेच एखादया विशेष प्रकल्पाची मागणी ५०००च्या चौ.मी. पेक्षा कमी असेल तर किमान ४००० चौ.मी. असेल तर त्या प्रकल्पामधील गुंतवणूक, रोजगार निर्मिती इत्यादी बाबींचा विचार करुन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांच्या पूर्वपरवानगीने अशी प्रकरणे भुखंड वाटप समितीसमोर ठेवण्याबाबत धोरण आहे.

प्रकरणी नमूद करण्यात येते की, शासनाचे माहिती तंत्रज्ञान धोरण २०२३ नुसार आयटी/आयटीएस वापरासाठी संबधित भूखंडास पोहच रस्ता रुंदीच्या अनुषंगाने २/३/४ अतिरिक्त चटई निर्देशांक लागु करण्यात आले आहे. त्यामुळे माहिती तंत्रज्ञान वापराअंतर्गत भूखंडधारक १५०० ते २००० चौ.मी. क्षेत्रावर २/३/४ अतिरिक्त चटई निर्देशकांचा वापर करुन ३००० ते ४००० चौ.मी. क्षेत्राचे बांधकाम करु शकतात व त्यावर महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार गुंतवणूक करु शकतात.

midcconsultants.in



For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

महामंडळाच्या प्राधान्याने भूखंड वाटपासाठी कमीत कमी ४००० ते ५००० चौ.मी. या क्षेत्राचे अहर्तेबाबत परिपत्रक दिनांक १६.०३.२०२१ निर्गमित केलेले आहे. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, माहिती तंत्रज्ञान उद्यानातील भूखंडांकरीता दिनांक १६.०३.२०२१ च्या परिपत्रकामध्ये सुधारणा करणेबाबतचा प्रस्ताव महामंडळाच्या मा. सदस्य मंडळाच्या दिनांक १७.१०.२०२३ रोजी झालेल्या ३९७ व्या बैठकीमध्ये सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर बैठकीमध्ये सविस्तर चर्चा होऊन ठराव क्रमांक ६६५३ पारीत करण्यात आला असुन पुढीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यात येत आहे:

शासनाचे माहिती तंत्रज्ञान धोरण २०२३ नुसार माहिती तंत्रज्ञान/आयटी उद्योगांना प्राधान्याने भूखंड वाटप करताना अनुज्ञेय चटई निर्देशकांचा विचार करता, महामंडळाच्या क, ड आणि ड+ विभागातील औदयोगिक क्षेत्रामधील उद्योगांना भूखंडाची किमान मर्यादा १५०० चौ.मी. करण्यात येत आहे.

सदरहु परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे .

(पी. डी. मलिकनेर, भा.प्र.से.)
सह मुख्य कार्यकारी अधिकारी (विशेष प्रकल्प)
मऔविम, मुंबई

प्रत:

(१) सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
(२) मुख्य अभियंता, मऔविम, पुणे / छत्रपति संभाजीनगर / नागपूर
(३) महाव्यवस्थापक (भूमी /विधी/ भूसंपादन/मा व तं/ जनसंपर्क/म.ब.वि./डीएमआयसी/ पणन)
(४) सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम,
(५) सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम,
(६) सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम,
(७) सह / उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई / पुणे / छत्रपति संभाजीनगर / नागपूर.
(८) सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,
(९) सर्व औद्योगिक संघटना
(१०) मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती / मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ / जागतिक व्यापार केंद्र, मुंबई.



midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in